ePaper

**शिंदे समिती काम करते पण अधिकारी जातीवाद का करत आहेत? मनोज जरांगे**



| वर्ष - 7 | अंक - 234 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 3 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- यंदा आरसीबी किताब जिंकणार?
- प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन
- तीसरी बार मोदी सरकार
- आंतरवाली एकही कुणबी नोंद नाही


# वाकड-दत्तमंदिर रोडसाठी 'अवकृपा'!

## विकास आराखड्याची अंमलबजावणी होईना : सोसायटीधारक आता आंदोलनाच्या तयारीत!



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी आयटी हब आणि पिंपरी-चिंचवडला जोडणारा प्रमुख दुवा वाकड-दत्तमंदिर रस्ता रुंदीकरणासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. संबंधित रस्ता ४५ मीटर रुंद होईल, असा दावा करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात ३० मीटर रुंदीचाच रस्ता वाहनचालकांच्या माथी मारला जात आहे. त्यामुळे या भागातील सोसायटीधारकांनी प्रशासनाच्या कारभारावत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, आंदोलनात्मक पवित्रा घेण्याची तयारी सुरू केली आहे.**






वाकड-दत्तमंदिर रोड रुंदीकरणाबाबत स्थानिक सोसायटीधारकांनी आक्षेप घेतले आहेत. विकास आराखड्याप्रमाणे हा रस्ता ४५ मीटर होणे अपेक्षीत आहे. मात्र, प्रशासनाकडून नागरिकांच्या डोळ्यांमध्ये धूळफेक केली जात आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही निवेदन पाठवण्यात आले आहे. परिसरातील एकूण २२ सोसायटींनी लेखी स्वरुपात या कामावर आक्षेप नोंदवला आहे.

महापालिका प्रभाग क्रमांक २५ मध्ये असलेल्या वाकड-दत्तमंदिर रोडचे रुंदीकरण विकास आराखड्यातील नियोजनाप्रमाणे होत नाही. काही ठिकाणी अनिकृत बांधकामे आहेत. त्याला प्रशासनाकडून अभय देण्यात येत असून, त्या ठिकाणी रस्त्याची रुंदी अगदी ३० मीटरपर्यंतच ठेवण्यात आली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुंना अनधिकृत बांधकामे आहेत. त्यामुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आहे. त्यामुळे विकास आराखड्यात मंजूर असलेल्या नियोजनाप्रमाणे सदर रस्त्याचे काम करावे, अशी सोसायटीधारकांची मागणी आहे.

### अनधिकृत बांधकांना अभय कोणाचे?

हिंजवडी आयटी हब, पुणे-मुंबई महामार्गाहून पिंपरी-चिंचवडमध्ये प्रवेश करण्यासाठी वाकड-दत्तमंदिर रोडचा वापर सर्वाधिक होतो. पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव या भागातील रहदारीचा प्रमुख पर्याय म्हणून हा रस्ता ओळखला जातो. वाकड-भोसरी बीआरटी मार्गिकाही याच मार्गावर कार्यान्वयीत आहे. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत रस्ता विकसित करण्यात येत असून, मुख्य मार्गिकांच्या तुलनेत पदपथ आवश्यकतेपेक्षा जास्त रुंद करण्यात आले आहेत. दोन लेनची मार्गिका असली तर वाहनचालक पार्किंग अभावी एका लेनवर चारचाकी वाहने पार्क करीत असतात. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळेत वाहतूक समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत गेल्या अनेक वर्षांपासून विकास आराखड्याप्रमाणे ४५ मीटर रस्ता रुंदीकरण करावे, अशी मागणी होती. प्रशासनाने रस्ता रुंदीकरण काम सुरू केले आहे. मात्र, दोन्ही बाजुंना असलेले अतिक्रमण हटवण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे दत्त मंदिर रस्त्यावरील अतिक्रमणाला कोणाचे 'अभय' आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> स्थानिक सोसायटीधारकांनी दत्त मंदिर रोड रुंदीकरणाबाबत नोंदवलेले आक्षेप रास्त आहेत. विकास आराखड्याप्रमाणे प्रशासनाने ४५ मीटर रस्ता नागरिकांसाठी उपलब्ध करुन द्यावा. त्यासाठी सध्या सुरू असलेल्या रस्त्याचे कामाची पाहणी करावी. ज्या ठिकाणी रस्ता अरुंद होत आहे. नागरिकांना त्यांच्या हक्काचा रस्ता मिळावा. या करिता आम्ही आग्रही आहोत. प्रशासनाने योग्य दखल नाही घेतली, तर रहिवाशांच्या साथीने आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल.
>
> **-सचिन लोंढे, उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.**

> आमच्या सोसायटीच्या माध्यमातून रस्त्यासाठी जागा सोडली आहे. त्यामुळे सोसायटीधारकांना हक्काचा रस्ता मिळाला पाहिजे. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण असल्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. काही ठिकाणी ४५ मीटर आणि काही ठिकाणी ३०- २५ मीटर रस्ता होतो आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांनी तक्रार केली आहे.
>
> **. -- तेजस्विनी ढोमसे, शोनक टॉवर, सोसायटी.**

> दत्तमंदिर रोड डीपी प्लॅननुसार झालेला नाही. पार्किंगमध्येच अर्धी लेन जाते. दुकाने, स्टॉल, पत्राशेड आणि अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. नियोजनाप्रमाणे रस्ता तयार केल्यास नागरिकांच्या हिताचे राहील. सायंकाळी ५ नंतर वाहनचालकांना १५ मिनिटांच्या प्रवासासाठी १ तासाच्या ट्रॅफिकचा सामना करावा लागतो.
>
> **. - रितांश राज, पॅराडिजो सोसायटी**

# विजय शिवतारे खोटारडा माणूस!

## 32 हजार मतदार बोगस असल्याच्या आरोपावर जगतापांचे उत्तर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुरंदरमध्ये 32 हजार मतदार हे बोगस असल्याचं म्हणणारा विजय शिवतारे (VIJAY SHIVTARE) हा खोटारडा आणि बाजार बुणगा माणूस असल्याची टीका काँग्रेसचे आमदार संजय जगताप (SANJAY JAGTAP) यांनी केला. एकाच वेळी 32 हजार लोकांना नोटिस देणाऱ्या प्रशासनाने तेवढे लोक एकाच दिवशी आले तर काय करणार याचीही माहिती द्यावी असं ते म्हणाले. राज्याचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी संजय जगताप यांच्यावर केलेल्या आरोपांना त्यांनी उत्तर दिलं.**

पुरंदर विधानसभा मतदारसंघांमध्ये 32 हजार बोगस मतदार नोंद (Purandar Bogus Voter) असल्याचा आरोप माजी मंत्री विजय शिवतारे यांनी केला होता. या आरोपानंतर आता पुरंदरचे आमदार संजय जगताप हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. विजय शिवतारे बाजार बुनगे असल्याचं संजय जगताप म्हणाले आहेत. 32 हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांना 4 जानेवारीला सासवड येथे बोलण्यात आले आहे. यासंबंधी आमदार संजय जगताप यांनी प्रशासनाला चांगलंच धारेवर धरलं. पुरंदर तालुक्यातील तहसील कार्यालयात जाऊन आमदार संजय जगताप यांनी निवडणूक विभागाला याचा जाब विचारला. 32 हजार लोक एकाच दिवशी येणार असतील तर त्यांच्यासाठी काय सोय केली आहे? असा प्रश्न त्यांनी विचारला. यापूर्वीच आम्ही याबाबतची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली होती. मात्र त्याच्यावर कोणती कारवाई झाली? असा सवालही त्यांनी विचारला आहे. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष आणि युवा सेना तालुका अध्यक्ष या दोघांच्याही कुटुंबीयांची नावे दोन गावात असून त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही? असा सवाल आमदार संजय जगताप यांनी विचारलाय. पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांना मतदार यादीत दोन ठिकाणी नावे असल्याच्या कारणावरून नोटिस धाडण्यात आली आहे. 4 जानेवारीला आमदार संजय जगताप यांना कागदपत्रे घेऊन पुरंदर येथील उपविभागीय कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे. दोन दिवसांपूर्वी माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पुरंदर हवेलीमध्ये 32 हजार बोगस मतदार असल्याचा आरोप केला होता. हे सर्व बोगस मतदार विश्वजीत कदम यांच्या मतदारसंघातील असल्याचा देखील आरोप विजय शिवतारे यांनी केला होता. त्यावर आमदार संजय जगताप यांनी प्रतिक्रिया दिली होती की, सरकार तुमचे आहे चौकशी करा आणि कारवाई करा. त्यानंतर पुरंदर मधील अनेक मतदारांना नोटिसा गेल्या आहेत. आणि 4 जानेवारीला तालुक्याच्या ठिकाणी हजर राहण्यास सांगितला आहे. अशाच प्रकारची नोटीस आमदार संजय जगताप यांना देखील केली आहे. जर हजर राहिला नाहीत तर मतदार यादीतून नाव काढले जाईल अशी नोटिस धाडल्याने आमदार संजय जगताप आक्रमक झाले आहेत. 32 हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांना 4 जानेवारीला सासवड येथे बोलण्यात आले आहे. यासंबंधी आमदार संजय जगताप यांनी प्रशासनाला चांगलंच धारेवर धरलं. पुरंदर तालुक्यातील तहसील कार्यालयात जाऊन आमदार संजय जगताप यांनी निवडणूक विभागाला याचा जाब विचारला. असा प्रश्न त्यांनी विचारला. यापूर्वीच आम्ही याबाबतची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली होती. मात्र त्याच्यावर कोणती कारवाई झाली? असा सवालही त्यांनी विचारला आहे. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष आणि युवा सेना तालुका अध्यक्ष या दोघांच्याही कुटुंबीयांची नावे दोन गावात असून त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही? असा सवाल आमदार संजय जगताप यांनी विचारलाय. पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांना मतदार यादीत दोन ठिकाणी नावे असल्याच्या कारणावरून नोटिस धाडण्यात आली आहे. 4 जानेवारीला आमदार संजय जगताप यांना कागदपत्रे घेऊन पुरंदर येथील उपविभागीय कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे.





### संजय जगताप यांना नोटिस

» दोन दिवसांपूर्वी माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पुरंदर हवेलीमध्ये 32 हजार बोगस मतदार असल्याचा आरोप केला होता. हे सर्व बोगस मतदार विश्वजीत कदम यांच्या मतदारसंघातील असल्याचा देखील आरोप विजय शिवतारे यांनी केला होता. त्यावर आमदार संजय जगताप यांनी प्रतिक्रिया दिली होती की, सरकार तुमचे आहे चौकशी करा आणि कारवाई करा. त्यानंतर पुरंदर मधील अनेक मतदारांना नोटिसा गेल्या आहेत.जर हजर राहिला नाहीत तर मतदार यादीतून नाव काढले जाईल अशी नोटिस धाडल्याने आमदार संजय जगताप आक्रमक झाले आहेत. 32 हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. पुरंदरमध्ये 32 हजार मतदार हे बोगस असल्याचं म्हणणारा विजय शिवतारे हा खोटारडा आणि बाजार बुणगा माणूस असल्याची टीका काँग्रेसचे आमदार संजय जगताप यांनी केला. एकाच वेळी 32 हजार लोकांना नोटिस देणाऱ्या प्रशासनाने तेवढे लोक एकाच दिवशी आले तर काय करणार याचीही माहिती द्यावी असं ते म्हणाले. राज्याचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी संजय जगताप यांच्यावर केलेल्या आरोपांना त्यांनी उत्तर दिलं.

# शौर्य दिनानिमित्त दापोडी येथे शूरविरांना मानवंदना

## राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष शेखर काटे यांचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भीमा कोरेगाव येथील २०६वा शौर्य दिनानिमित्त दापोडी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी ५०० शहीद शूरविरांना मानवंदना अर्पण करण्यात आली.**



भीमा कोरेगाव इथे १ जानेवारी १८१८ मध्ये एक ऐतिहासिक लढाई झाली होती. ही लढाई इंग्रज आणि पेशव्यांमध्ये झाली होती. महार समाजातील सैन्याच्या जोरावर इंग्रजांनी पेशवाईविरुद्ध युद्ध पुकारले होते. हे युद्ध इंग्रजांनी जिंकल्यानंतर त्यांनी लढाईच्या स्मरणार्थ कोरेगाव भीमा येथे विजय स्तंभ बांधण्यात आला. दरवर्षी कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी रोजी विजयस्तंभ शौर्य दिन अनुयायांकडून मोठ्या उत्साहात साजरा होतो. या विजयस्तंभाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ जानेवारी १९२७ रोजी आपल्या अनुयायांसह भेट देत मानवंदना दिली होती. तेव्हापासून हजारो आंबेडकर दरवर्षी मोठ्या उत्साहाने भीमा कोरेगावला येतात. यावेळी नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे, पोलीस उपनिरीक्षक राजू भास्कर, एलआयबीचे अधिकारी अडसूळ, मैत्री ग्रुपचे भाऊसाहेब मुगुटमळ, रवी कांबळे, राष्ट्रवादी महिला काँग्रेस झोपडपट्टी सेल अध्यक्ष सुनीताताई अडसूळ, धोंडाबाई गायकवाड, संगीता सोनवणे, विद्याताई गायकवाड, फमिदा शेख, सचिन गायकवाड, अशोक कांबळे, हर्षल मोरे (उपाध्यक्ष रा. यु. काँग्रेस पिं. चिं. शहर ), दिपक भाऊ साळवे, अशोकभाऊ कांबळे (पेंटर), सनी खंडागळे, प्रणव गायकवाड, चेतन जोशी, अमित घाडगे, अजय खंडागळे, अमित जाधव, सचिन शेलार, नंदू भुजंग, बंडूभाऊ गायकवाड, अखिल काझी, विलास शिंदे, मनिष बोदडे, गणेश आटोळे, ऍप्पल ओसवाल, तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक, पुरुष, महिला, लहान मुलं, युवक, युवती व शेखर भाऊ युवा प्रतिष्ठान ग्रुप, स्वरूप सिंधू माई महिला बचत गट ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

### जुलमी विचारसरणीविरोधात लढण्याची प्रेरणा

» इंग्रजांच्या सत्ताकाळात 'One of the Triumphs of the British Army of the Earth' असे लिहित शूर महार सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारला त्यावर २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे कोरलेली आहेत. हा इतिहास जुलमी विचारसरणीविरोधात लढण्याची प्रेरणा कायम देत राहील.

# शिवसेनेची लोकसभेची तयारी!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची किवळेत सभा; शिवसेना उपनेते, खा. श्रीरंग बारणे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली असून मुख्य नेते, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसंकल्प अभियानाला पुण्यातून सुरुवात होणार आहे. येत्या शनिवारी (दि.६) सायंकाळी साडेचार वाजता किवळे येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन आपल्या दारी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यभर राबविला. या उपक्रमामुळे राज्यातील जनतेला एकाच छताखाली विविध कागदपत्रे मिळाली. थेरगाव, मावळमध्ये देखील हा उपक्रम झाला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री शिंदे हे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात गेले. लोकांसाठी विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या. त्यामुळे राज्यातील जनता त्यांच्या कामावर खुश आहे.

आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे राज्याचा दौरा करत आहेत. शिवसेनेचे खासदार असलेल्या, मागीलवेळी शिवसेनेने निवडणूक लढविलेल्या मतदारसंघात मुख्यमंत्री शिंदे जाणार आहेत. त्यांच्या शिवसंकल्प अभियानाला पुण्यातून सुरुवात होणार आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा किवळेतील मुकाई चौकात शनिवारी मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा होणार आहे. या मेळाव्याला मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन खासदार बारणे यांनी केले.

---

# शहरात ३२२ तळीरामांवर पोलिसांची कारवाई!

## अडीच हजार वाहनांची तपासणी; 20 लाख 60 हजारांचा दंड वसूल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वर्षाचा शेवटचा दिवस साजरा करण्यासाठी अनेकांनी मदिरा सेवनास प्राधान्य दिले. मात्र त्यानंतर वाहन न चालवण्याचा नियम मात्र ते तळीराम विसरले. पण 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड पोलिसांनी मात्र शहरात ठीक ठिकाणी नाकाबंदी लावली होती. या नाकाबंदीमध्ये रात्रभरात 322 तळीराम मदिरा सेवन करून वाहन चालवताना आढळून आले. त्यांच्यावर पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.**



नववर्ष स्वागतासाठी नागरिक मोठ्या संख्येने घराबाहेर पडले. यात हॉटेलसह मॉल, बाजारपेठेत मोठी गर्दी झाली. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी रविवारी (दि. 31) सायंकाळपासून मोठा बंदोबस्त तैनात केली होता. बंदोबस्तासाठी अडीच हजार पोलिस रस्त्यावर उतरले होते. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्याकडून सातत्याने आढावा घेण्यात येत होता. स्थानिक पोलीस ठाणे तसेच गुन्हे शाखेच्या विविध पथकांकडून गस्त घालण्यात आली. तसेच शहरात 40 ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. नववर्षाचे स्वागत करताना रस्त्यावर गोंधळ घालणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाई केली. रात्री उशिरापर्यंत नियमांचे उल्लंघन करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवरही कारवाई केली.

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडून मुख्य चौक, अंतर्गत रस्ते तसेच महामार्गावर(CHINCHWAD) ठिकठिकाणी वाहन चालकांची तपासणी करण्यात आली. यातील मद्यपी चालकांवर कारवाई केली. पोलीस आयुक्तालयांतर्गत हॉटेल, ढाब्यांसह विविध 473 आस्थापनांची पोलिसांकडून पाहणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. पोलिस आयुक्तालयांतर्गत रेकॉर्डवरील तसेच विविध गुन्हे दाखल असलेल्या संशयितांची तपासणी करण्यात आली. यात रविवारी रात्री 415 संशयितांना चेक करून आढावा घेण्यात आला. बंदोबस्त तसेच नाकाबंदी दरम्यान संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. पोलिस आयुक्तालयांतर्गत रविवारी अशा संशयित 2425 वाहनांची पोलिसांनी तपासणी केली. यात बेशिस्त वाहनचालकांना 20 लाख 60 हजार 800 रुपयांचा दंड आकारला. नववर्षाचे स्वागत करण्यासाठी जुगार अड्डा चालविण्यात येत होता. पोलिसांना याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी कारवाई करून जुगाराचा डाव उधळून लावला.

### पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केलेली कारवाई

- ड्रंक अँड ड्राईव्ह – 322
- संशयित चेकिंग – 415
- वाहने चेकिंग – 2425
- अवैध धंदे कारवाई – 10
- आस्थापना चेकिंग – 473
- अवैध धंदे कारवाईमधील जप्त मुद्देमाल – 2 लाख 9 हजार 875
- वाहनांवर केलेल्या कारवाईचे दंडाची रक्कम – 20 लाख 60 हजार 800

---



# पिंपळे सौदागरमध्ये नववर्षानिमित्त ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

। पिंपरी ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागताचे औचित्य साधून पिंपळे सौदागर येथील साई पर्ल सोसायटीमध्ये सादर करण्यात आलेला सांस्कृतिक कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. सोसायटीमधील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने आयोजित या रंगारंग कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या मराठी – हिंदी चित्रपटातील सदाबहार गाणी, शेरशायरी आणि मिमिक्रीला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचा प्रारंभ श्रीकांत माने यांनी "ना हम तुम्हे जाने ना तुम हमे जाने" या गीताने केला. त्यानंतर मधू मेघानी, अरविंद माने, मानसी कुलकर्णी, किरण तिर्थगिरीकर, चंद्रकांत पवार, मीनाक्षी माने, विलास भाले, भारती न्यायाधीश, वंदना जोशी, रसिका काटे, संध्या नांदगावकर, मंजिरी बनसोडे या कलावंतांनी आपली कला सादर केली.सदाबहार अशा या कार्यक्रमाची सांगता सहभोजन आणि नववर्षाचे स्वागत तसेच लहानू कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोसायटीमधील सुखदेव फुलेवाले, रामकुमार अग्रवाल, किशोर मेघानी, दिलीप नांदगावकर, बाळासाहेब काटे, वसंत बिरुड, तानाजी कांबळे, मधुकर चौधरी, दासाणी, वारके यांनी परिश्रम घेतले.




# निष्पक्ष कारवाईची धमक असावी!

**बनारस विद्यापीठाच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीचा विनयभंग व अश्लील चित्रीकरण केल्याच्या आरोपावरून तब्बल दोन महिन्यांनंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणातील आरोपी भाजपच्या आयटी सेलशी संबंधित असल्याचा आरोप आहे.**

या संस्थेतील विद्यार्थ्यांनी चालवलेल्या आंदोलनाचा रेटा नसता तर ही कारवाई झाली असती का? हा यातला कळीचा प्रश्न. गेल्या ३ नोव्हेंबरला पहाटे ही मुलगी तिच्या एका मित्रासोबत संस्थापरिसरात असताना कुणाल पांडे, सहसंयोजक सक्षम पटेल व आनंद ऊर्फ अभिषेक चव्हाण या तिघांनी हे घाणेरडे कृत्य केल्याचा आरोप आहे. या तिघांचे वर्तन आणि अरेरावी याचा निषेध करण्यासाठी अन्य विद्यार्थी रस्त्यावर उतरले. यात आरोपी कोण हे अनेकांना ठाऊक होते पण यंत्रणांनी त्यांना हात लावण्याची हिमत दाखवली नव्हती. अखेर प्रकरणाची व्याप्ती वाढते आहे व याचा राजकीय तोटा होण्याची शक्यता अधिक आहे हे लक्षात आल्यावर हे तिघे जेरबंद झाले. मधल्या काळात या संस्थेतील आंदोलक विद्यार्थ्यांपुढे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजय रॉय यांनी अभाविपवर टीका करताच ही संघटना खवळली व त्यांनी प्रतिआंदोलन करून काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी




केली. हा प्रकार म्हणजे चोराच्या उलटय़ा.. हे या अटकेनंतर सिद्ध झाले. शतप्रतिशत भाजपचा ध्यास घेतलेल्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या काही वर्षांत विद्यापीठांमध्ये जो अनिर्बंध धुडगूस घालणे सुरू केले तो कोणत्या थराला जाऊ शकतो हे आधी जेएनयूमध्ये दिसलेच होते व आता या घटनेने त्यावर जणू शिक्कामोर्तबच झाले. महिलांविषयक प्रकरणे अतिशय संवेदनशीलतेने हाताळावीत, त्यात सहभागी असलेला गुन्हेगार कितीही मोठा असो, त्याला पाठीशी घातले जाऊ नये हा संकेत कटाक्षाने पाळणारी नोकरशाही राजकीय हस्तक्षेपासमोर कशी लाचार होते हे अलीकडे वारंवार दिसू लागले आहे. विद्यापीठ परिसरात घडलेल्या या घटनेचे सीसीटीव्ही चित्रण व अन्य पुरावे उपलब्ध असतानासुद्धा वाराणसी पोलिसांनी दोन महिने उशीर केला यावरून हे सिद्ध होते. यातील पीडित विद्यार्थिनी जर सत्तापक्षाशी संबंधित एखाद्याची मुलगी असती तर सरकार व नोकरशाही अशीच वागली असती का? अशा गुन्हेगारांना राजकीय संरक्षण देणे हे कोणत्या नैतिकतेत बसते? उठसूट महिला सन्मानाच्या गप्पा करणाऱ्या सत्ताधीशांचे या प्रकरणावरचे मौन नेमके काय दर्शवते? याच राज्यातील कथित बेकायदा बांधकामाच्या केवळ संशयावरून ही बांधकामे जमीनदोस्त करणाऱ्या योगी सरकारची कार्यक्षमता नेमक्या या प्रकरणात कशी काय गायब झाली, हा एक प्रश्न. त्यांचा विख्यात बुलडोझर या प्रकरणात कसा काय ठप्प होता? या प्रश्नांची उत्तरे देण्याचीही गरज नाही, इतकी ती स्पष्ट आहेत. गुन्हेगारीविषयक कायदे बदलून उपयोग नाही तर आहे त्या कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य प्रशासनाला देणे गरजेचे, हे तत्त्व सत्ताधाऱ्यांना मान्य आहे काय? मान्य नसेल तर नव्या भारतीय न्याय संहितेची गरजच काय? जे सत्तेत आहेत त्यांना सगळे गुन्हे माफ. आम्ही म्हणू तोच कायदा ही अलीकडे वाढत चाललेली प्रवृत्ती नेमकी काय दर्शवते? यासारखे अनेक प्रश्न या घटनेने उपस्थित केलेले. भारतीय तंत्रज्ञान व व्यवस्थापन यासारख्या संस्था उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी आजही ओळखल्या जातात. राजकीय हव्यासापोटी तेथील विद्यार्थिनींना अशा प्रसंगाला सामोरे जावे लागत असेल तर ते संपूर्ण समाजासाठीच लाजिरवाणे आहे. केवळ विद्यार्थिनीच नाही तर यानिमित्ताने संस्थेचीच बदनामी करणाऱ्या अशा धटिंगणांना राजकीय आश्रय न देण्याची धमक भाजपला या प्रकरणात तसेच भविष्यातही दाखवावी लागेल. आपल्याकडचे विद्यार्थी परदेशातच संधी का शोधत असतात याचे एक उत्तर यात दडलेले आहे. हा यातला कळीचा प्रश्न. गेल्या ३ नोव्हेंबरला पहाटे ही मुलगी तिच्या एका मित्रासोबत संस्थापरिसरात असताना कुणाल पांडे, सहसंयोजक सक्षम पटेल व आनंद ऊर्फ अभिषेक चव्हाण या तिघांनी हे घाणेरडे कृत्य केल्याचा आरोप आहे. या तिघांचे वर्तन आणि अरेरावी याचा निषेध करण्यासाठी अन्य विद्यार्थी रस्त्यावर उतरले. यात आरोपी कोण हे अनेकांना ठाऊक होते पण यंत्रणांनी त्यांना हात लावण्याची हिमत दाखवली नव्हती.

## संपादकीय »

### रस्म-ए-'उल्फा'त..

***वर्ष संपता संपता गृहमंत्री अमित शहा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांच्या उपस्थितीत 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' (उल्फा) या संघटनेशी शांतता करार केला.***

वर्ष संपता संपता गृहमंत्री अमित शहा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांच्या उपस्थितीत 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' या संघटनेशी शांतता करार केला. असे गृहमंत्री शहा म्हणाले. ते ठीक. त्या राज्याचे मुख्यमंत्री हिमंता सर्मा हे एकेकाळी 'आसाम गण परिषद' या संघटनेचे क्रियाशील सदस्य होते. एकेकाळी या संघटनेने आसामच काय पण संपूर्ण ईशान्य भारतच कसा हादरवून सोडला होता, हे अनेकांस स्मरेल. त्यामुळे आसाम गण परिषदेचे जे झाले ते अजिबात आश्चर्याचे नाही. या संघटनेतील काही काँग्रेसवासी झाले, काही भाजपच्या धारेस लागले तर काही कालबाह्य झाले. सर्मा राजकीयदृष्ट्या चिवट. बारा पिंपळावरच्या मुंजाप्रमाणे ते अनेक पक्षांचे पाणी पिऊन अखेर'च्या उद्धारार्थ भाजपत दाखल झाले. आधी राजीव गांधी यांनी आसाम गण परिषदेशी करार केल्याचेही अनेकांस स्मरेल.

**महाविकास आघाडी सरकारने मेट्रो, कारशेड, समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, मुंबई-न्हावाशेवा-शिवडी ट्रान्सहार्बर लिंक, सी लिंक, मुंबई-पुणे एक्स्प्रेसमधील मिसिंग लिंक प्रकल्प, कोस्टल रोड अशा अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत यू-टर्न घेऊन ते बंद करून टाकले होते.**

# कोविडकाळातील भ्रष्टाचाराला क्षमा नाही!

आमच्या सरकारने त्यांना फास्ट ट्रॅकवर आणलं. एफडीआयपासून शिक्षण क्षेत्रापर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये एकेकाळी आघाडीवर असलेलं आपलं राज्य मधल्या अडीच वर्षांच्या काळात मागे पडलं. आम्ही कारभार हाती घेतल्यानंतर आपलं राज्य एफडीआयच्या बाबतीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आणण्याचं काम आम्ही केलं. शेतकऱ्यांना ज्या योजना लागू केल्या, आपण निकष बदलून ज्या ज्या वेळेस शेतकऱ्यांचं नुकसान झालं, त्या त्यावेळी शेतकऱ्यांच्या मागे आपलं सरकार उभं राहिलं. मराठा आरक्षणाबाबतही आपलं सरकार मराठा बांधवांच्या पाठी ठामपणे उभं राहिलं. मराठा आरक्षणाबाबत दोन्ही सभागृहांमध्ये मी विस्तृत माहिती दिली, पुढची दिशादेखील स्पष्ट केली. यासंदर्भात मराठा समाजाने मोठय़ा प्रमाणावर समाधान व्यक्त केलं आहे. कितीही आरोप केले तरीही आम्ही जे काम करतोय ते सगळय़ांसमोर आहे. कोविडवर पण बोलायला हवं. कोविडकाळात झालेला भ्रष्टाचार



पाहिल्यानंतर कफनचोर, खिचडीचोर अशी बिरुदंदेखील कमी पडतील. ऑक्सिजन प्लांट रुग्णांना जीवदान देण्याचं काम करत होते. पण यात काही लोकांच्या कृपेने अक्षरशः टेंडरचा पाऊस पडला आणि उत्तर प्रदेशातील 'हायवे कंपनी' या ठिकाणी अशी काही तळपली की, स्वतःचं मुख्य काम सोडून 'रोमिंग पॉवर ऑफ ॲटर्नी' देऊन इतर अवांतर कामंही घेतली. या प्रकरणातील एक महत्त्वाचं प्यादं आहे रोमिल छेडा. या कंपनीच्या सुरस कथांची सुरुवात झाली, ती जिजामाता उद्यानातील पेंग्विन प्रकरणापासून. हायवे बनवणाऱ्या कंपनीला चक्क पेंग्विनसाठीचं कंत्राट मुंबई महापालिकेनं बहाल केलं. या हायवे कंपनीने पॉवर ऑफ ॲटर्नीद्वारे हे काम रोमिल छेडाला दिलं. पुढील चार वर्षांत छोटी-मोठी मिळून सुमारे २७० कोटी रुपयांची तब्बल ५७ कंत्राटं देण्यात आली. यानंतर या कंपनीला पुढे ठेवून रोमिलला कोविडकाळात चक्क ऑक्सिजन प्लांट उभारण्याचं कंत्राटदेखील देण्यात आलं. ऑक्सिजन प्लांट उभारण्याचं त्याचं काम असेल, अशी कोणाची समजूत होईल, पण गंमत म्हणजे त्याचं बोरिवलीत परिहार डिपार्टमेंटल स्टोअर नावाचं कपडय़ाचं दुकान होतं, हे तपासात आलेलं आहे. हायवे कंपनीला कंत्राट मिळताच दोन टक्के पैसे ठेवून उर्वरित सर्व पैसे या 'रोमिंग' छेडाच्या खात्यात फिरवण्यात आले. ऑक्सिजन प्लांटचं काम जुलै महिन्यात पूर्ण करणं अपेक्षित असताना प्रत्यक्षात ऑक्टोबर महिन्यात पूर्ण झालं. मात्र, सदर काम एक महिना उशिरा, म्हणजे ऑगस्टमध्ये पूर्ण झालेलं दाखवून त्यासाठी केवळ तीन कोटींचा दंड ठोठावण्यात आला. ऑगस्टमध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे काम पूर्ण झाल्याचं दाखवलं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आंतरवाली एकही कुणबी नोंद नाही!

## जरांगेंचं कुटुंब आरक्षणापासून वंचित राहणार?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाचा (MARATHA RESERVATION) केंद्रबिंदू बनलेल्या आंतरवाली सराटी हे गाव आज देशभरात चर्चेला आला आहे. याच गावात सुरू झालेल्या आंदोलनानंतर आज राज्यभरातील लाखो लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळालं आहे. मात्र, याच अंतरवाली सराटी गावातील मराठा समाजातील एकही व्यक्तीकडे कुणबी प्रमाणपत्र नसल्याने या गावाला मराठा आरक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.**




अंबड महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार संपूर्ण आंतरवाली सराटी गावात आजपर्यंत एकही मराठा कुणबी नोंद मिळालेली नाही. त्यामुळे, ज्या गावातून मराठा आंदोलनाची ठिणगी पडली, ज्या गावाने महाराष्ट्रातील मराठ्यांना एकत्र आणलं, ज्या गावामुळे लाखो लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आणि ज्या गावाने मनोज जरांगेंसारखा (Manoj Jarange) आंदोलक उभा केला त्या आंतरवाली सराटी गावातील मराठा बांधव आरक्षणापासून वंचित राहणार आहे. आंतरवाली सराटी हे जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील छोटेस गाव, मात्र हेच गाव आज मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. मराठा आरक्षणाच्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी याच गावातून घडतायत. याच आंतरवाली सराटीमधील आंदोलनानंतर महाराष्ट्रातील मराठे पहिल्यांदाच एकत्र आले. एवढंच नाही तर याच आंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनानंतर, महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांना आज कुणबी प्रमाणपत्र मिळालं आहे. पण दुर्दैवाने याच आंतरवाली सराटी गावातील एक ही मराठा व्यक्तिकडे कुणबी प्रमाणपत्र नसल्याचं समोर आलं आहे. अंबड तालुक्यातील 138 गावांमध्ये 2 लाख 88 हजार 523 दस्तावेज तपासण्यात आले. ज्यात 12 गावात 127 मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या. विशेष म्हणजे या 12 गावात आंतरवाली सराटीचा समावेश नसल्याचा देखील समोर आला आहे. मराठा आरक्षणासाठी ज्या आंतरवाली सराटीने एवढं मोठं आंदोलन उभं केलं, त्याच आंतरवालीतील मराठ्यांना आरक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे यात मनोज जरांगे यांचा देखील समावेश आहे. फक्त आंतरवाली सराटीच नाही, तर अनेक गावात मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या नसल्याने मनोज जरांगे यांनी संताप व्यक्त केला आहे. बीडच्या गेवराई तालुक्यातील निरंक अहवाल दिला होता, आता त्यानंतर तिथे मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या असा आरोप जरांगे यांनी केला आहे. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आतापर्यंत ज्या-ज्या गावात आंदोलन केले आहे, त्या सर्वच गावात एकही मराठा कुणबी नोंद मिळालेली नाही. मराठा आरक्षणाचा मार्ग दाखवणारा, मराठा आरक्षणासाठी लढा उभारणारा, आणि मराठा आरक्षण देण्यासाठी सरकारला भाग पाडणारा आंतरवाली सराटी गाव, पण याच आंतरवाली सराटी गावात एकही मराठा कुणबी नोंद आढळून आली नाही. त्यामुळे कुणबी प्रमाणपत्रांच्या आधारावर सरकारने महाराष्ट्रात मराठा आरक्षणाची घोषणा केली तरी, त्यापासून आंतरवाली सराटी मात्र वंचित राहणार हे नक्की आहे. आंतरवाली सराटी गावात आजपर्यंत एकही मराठा कुणबी नोंद मिळालेली नाही. त्यामुळे, ज्या गावातून मराठा आंदोलनाची ठिणगी पडली, कुणबी प्रमाणपत्र मिळाले आणि ज्या गावाने मनोज जरांगेंसारखा आंदोलक उभा केला त्या आंतरवाली सराटी गावातील मराठा बांधव आरक्षणापासून वंचित राहणार आहे.

### 12 गावात 127 मराठा कुणबी नोंदी

» अंबड तालुक्यातील छोटेस गाव, मात्र हेच गाव आज मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू बनला आहे. मराठा आरक्षणाच्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी याच गावातून घडतायत. याच आंतरवाली सराटीमधील आंदोलनानंतर महाराष्ट्रातील मराठे पहिल्यांदाच एकत्र आले. एवढंच नाही तर याच आंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनानंतर, महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांना आज कुणबी प्रमाणपत्र मिळालं आहे. पण दुर्दैवाने याच आंतरवाली सराटी गावातील एक ही मराठा व्यक्तिकडे कुणबी प्रमाणपत्र नसल्याचं समोर आलं आहे. अंबड तालुक्यातील 138 गावांमध्ये 2 लाख 88 हजार 523 दस्तावेज तपासण्यात आले. ज्यात 12 गावात 127 मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या. विशेष म्हणजे या 12 गावात आंतरवाली सराटीचा समावेश नसल्याचा देखील समोर आला आहे. मराठा आरक्षणासाठी ज्या आंतरवाली सराटीने एवढं मोठं आंदोलन उभं केलं, त्याच आंतरवालीतील मराठ्यांना आरक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे यात मनोज जरांगे यांचा देखील समावेश आहे. फक्त आंतरवाली सराटीच नाही, तर अनेक गावात मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या नसल्याने मनोज जरांगे यांनी संताप व्यक्त केला आहे.

# बायकोनेच दाखल केला नवऱ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा!

## नवरा म्हणतो, लग्न झाल्यानंतर बायको माझ्याच जातीची झाली

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केवळ मागासवर्गीय समाजाचा आहे म्हणून जातीवाचक शिवीगाळ, मारहाण करून हीन वागणूक दिली म्हणून सवर्ण जातीच्या व्यक्तिविरूद्ध पीडित मागासवर्गीय व्यक्तीकडून ॲट्रॉसिटी कायद्याखाली फिर्याद दाखल होण्याचे प्रकार नवीन नाहीत. परंतु एका महिलेने आपल्याच नवऱ्यावर ॲट्रॉसिटी कायद्याखाली फिर्याद नोंदविण्याचा आनोखा प्रकार पंढरपुरात घडला आहे.**

न्यायालयीन इतिहासात बायकोकडून स्वतःच्या नवऱ्यावर ॲट्रॉसिटी दाखल करण्याची ही पहिलीच घटना असल्याचे मानले जात आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या संबंधित नवरा-बायकोमध्ये बेबनाव झाल्यानंतर त्याचे लोन चक्क ॲट्रॉसिटी कायद्याखाली नवऱ्याविरूद्ध फिर्याद नोंदवून त्याच्या अटकेपर्यंत पोहोचले आहे. या अनोख्या खटल्याची माहिती अशी की फिर्यादी आणि आरोपी यांचा प्रेम विवाह झाला होता. फिर्यादी दलित समाजातील तर आरोपी सवर्ण समाजातील असल्याची माहिती आहे. वैवाहिक आयुष्यात त्यांच्या पोटी दोन मुलीही जन्माला आल्या. अलिकडे काही दिवसांपासून



नवऱ्याकडून आपणास जातीवरून अपमानास्पद आणि हीन वागणूक दिली जाते, नवऱ्याने आपल्या इच्छेविरूद्ध लैंगिक अत्याचारही केला, अशी फिर्याद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात पीडित बायकोने नोंदविली. त्यानुसार नवऱ्याविरुद्ध ॲट्रॉसिटीसह भारतीय दंड संविधान कलमान्वये गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी नवऱ्यास अटक करून त्याची कारागृहात रवानगी केली. दरम्यान, आरोपीने पंढरपूर न्यायालयात ज्येष्ठ फौजदारी विधीज्ञ धनंजय माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला आहे. लग्न झाल्यानंतर बायको नवऱ्याच्या जातीची झाली आहे, त्यामुळे ॲट्रॉसिटी कायद्याने नवऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल होऊ शकत नाही, असे जामीन अर्जात नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने ,ॲड. सिद्धेश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम, ॲड वैभव सुतार हे काम पाहत आहेत. नवऱ्याविरुद्ध बायकोने ॲट्रॉसिटी कायद्याखाली खटला दाखल करण्याची न्यायालयीन इतिहासातील पहिलीच घटना असल्याचे बोलले जाते.

### नवऱ्याला अटक

» अलिकडे काही दिवसांपासून नवऱ्याकडून आपणास जातीवरून अपमानास्पद आणि हीन वागणूक दिली जाते, नवऱ्याने आपल्या इच्छेविरूद्ध लैंगिक अत्याचारही केला, अशी फिर्याद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात पीडित बायकोने नोंदविली. पोलिसांनी नवऱ्यास अटक करून त्याची कारागृहात रवानगी केली.केवळ मागासवर्गीय समाजाचा आहे म्हणून जातीवाचक शिवीगाळ, मारहाण करून हीन वागणूक दिली म्हणून सवर्ण जातीच्या व्यक्तिविरूद्ध पीडित मागासवर्गीय व्यक्तिकडून ॲट्रॉसिटी कायद्याखाली फिर्याद दाखल होण्याचे प्रकार नवीन नाहीत.

# मालवाहतूकदारांचा संप मागे!

## हिट अँड रन' कायद्याबाबत केंद्र सरकारचं स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नवीन 'हिट अँड रन' कायद्याच्या विरोधात देशातील माल वाहतूकदार आणि ट्रक चालक संपावर गेले आहे. भारतीय न्यायिक संहिता २०२३ मध्ये दुरूस्ती केल्यानंतर 'हिट अँड रन' प्रकरणात दोषी चालकाला ७ लाख रूपयांपर्यंत दंड आणि १० वर्षांपर्यंतच्या तुरूंगवासाची तरतूद करण्यात आली आहे. त्यापार्श्वभूमीवर ट्रक चालकांनी संपाचं हत्यार उपसलं होतं. मात्र, केंद्र सरकारशी चर्चा केल्यानंतर अखिल भारतीय मालवाहतूक कॉंग्रेस संघटनेनं चालकांना कामावर रूजू होण्याचं आवाहन केलं आहे.**



अखिल भारतीय माल वाहतूक कॉंग्रेस संघटनेच्या प्रतिनिधींनी केंद्र सरकारशी चर्चा केली. या बैठकीनंतर गृहमंत्रालयाचे सचिव अजय भल्ला यांनी नवीन कायदा अद्याप लागू करण्यात आला नाही, अशी माहिती दिली. अखिल भारतीय माल वाहतूक कॉंग्रेस संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. नवीन कायदे अद्याप लागू करण्यात आलेले नाही. भारतीय न्यायिक संहिता १०६ (२) लागू करण्याआधी भारतीय माल वाहतूक कॉंग्रेस संघटनेशी चर्चा केल्यानंतर निर्णय घेतला जाईल. अखिल भारतीय कॉंग्रेस आणि सगळ्या चालकांना संप मागे घ्यावा," असं आवाहन अजय भल्ला यांनी केलं. अखिल भारतीय माल वाहतूक कॉंग्रेस संघटनेचे अध्यक्ष मलकित सिंग यांनी म्हटलं, "भारतीय न्यायिक संहिता १०६ (२) या कायद्यानुसार १० वर्षांची शिक्षा आणि दंड अद्याप लागू करण्यात आला नाही. चालकांनी कुठलीही काळजी करण्याची गरज नाही. 'हिट अँड रन' कायदा लागू होऊ देणार नाही. कायदा लागू झाल्यास आमच्या मृतदेहांवरून सरकारला जावं लागेल. चालकांनी पुन्हा कामावर रुजू व्हावं." मागील दोन दिवसांपासून राज्यासह देशभरात सुरू असलेल्या संपावर तोडगा निघाला आहे. केंद्रीय गृह सचिवांसोबत ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसचे शिष्टमंडळाची चर्चा झाली. या चर्चेअंती नवीन मोटर वाहन कायद्यातील (NEW MOTOR VEHICLE ACT) शिक्षा आणि दंडाच्या नव्या तरतुदी लागू होणार नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता मालवाहतूकदार, टॅंकर चालकांचा संप मागे घेतला जाणार आहे. बुधवारपासून मालवाहतूक सुरळीतपणे सुरू होईल, असा अंदाज आहे. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसनेह चालकांना वाहतूक तात्काळ सुरू करण्याचे आवाहन केले आहे. मागील दोन दिवसांपासून मालवाहतूकदार, टॅंकरचालकांचा संप सुरू असल्याने राज्यासह अनेक ठिकाणी इंधनापासून ते भाजीपाला, अत्यावश्यक गोष्टींचा पुरवठा थांबला होता. देशभरात ट्रक चालकांनी संप पुकारल्याने पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचे चित्र होते. अनेक ठिकाणी पेट्रोलपंप इंधनाअभावी ओस पडले होते. तर, पेट्रोल भरून घेण्यासाठी ठिकठिकाणी पेट्रोल पंपावर रांगाच रांगा लागल्या होत्या. या संपाची धग तीव्र होत असताना दुसरीकडे केंद्र सरकारने मालवाहतूकदारांच्या संघटनांना चर्चेसाठी बोलावले.

### नवीन कायद्यात आक्षेप कशावर?

या चर्चेत संपाबाबत अखेर तोडगा काढण्यात आला. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसचे बल मलकित सिंग यांनी म्हटले की, गृहसचिवांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. कलम 106(2) अद्याप लागू करण्यात आलेले नसल्याचे त्यांनी म्हटले. कायद्याची अंमलबजावणी होणार नाही असेही आश्वासन गृहसचिवांनी दिले असल्याचे सिंग यांनी म्हटले. या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सरकारने केल्यास त्यांना आमच्या मृतदेहांवर जावे लागेल असा इशाराही त्यांनी दिला. ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसच्या बैठकीबाबत केंद्रीय गृहसचिव अजय भल्ला म्हणाले, "आम्ही आज ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. सरकारला सांगायचे आहे की नवीन कायदे आणि तरतुदी अद्याप लागू झालेल्या नाहीत, भारतीय न्यायिक संहितेच्या कलम 106(2) ला लागू करण्यापूर्वी, ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसशी सल्लामसलत केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी म्हटले.

# निवडणुकीसाठी भाजपाचं घोषवाक्य!

## अबकी बार 400 पार, तीसरी बार मोदी सरकार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीला अवघे काहीच महिने बाकी आहेत. त्यामुळे देशभरातील सर्वच पक्षांनी निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. भारतीय जनता पार्टी याबाबतीत आघाडीवर आहे. भाजपाने निवडणुकीच्या कामाला सुरुवात केली आहे. दरम्यान, या पक्षाने निवडणुकीसाठीचं घोषवाक्यदेखील तयार केलं आहे. हे घोषवाक्य भाजपा पदाधिकाऱ्यांनी समाजमाध्यमांवर शेअर करण्यास सुरुवात केली आहे. नवी दिल्लीत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची मंगळवारी (२ डिसेंबर) महत्त्वाची बैठक पार पडली.**



या बैठकीला भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, पक्षाचे सरचिटणीस सुनील बन्सल, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, रेल्वेमंत्री अश्विनी वैश्णव आणि मनसुख मांडविया उपस्थित होते. भाजपाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी 'अबकी बार ४०० पार, तीसरी बार मोदी सरकार' हे घोषवाक्य जाहीर केलं आहे. आगामी निवडणुकीच्या काळात टीव्हीवर, रेडिओवर, सोशल मीडियावर, भाषणं आणि प्रचारसभांमध्ये हेच घोषवाक्य सतत आपल्या ऐकायला मिळणार आहे. यासह भाजपाने लोकसभा आणि विधानसभा स्तरावर संयोजकांची नेमणूक केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा देशव्यापी दौरा करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दौरा २२ जानेवारीपासून सुरू होईल. भाजपाने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत 'अच्छे दिन आने वाले हैं' आणि 'अब की बार मोदी सरकार' अशा घोषणा दिल्या होत्या. तर २०१९ च्या निवडणुकीत 'फिर एक बार मोदी सरकार' अशी घोषणा दिली. या दोन्ही निवडणुकांमध्ये भाजपाने मोठा विजय मिळवला होता. त्यामुळे गेली १० वर्ष देशात भाजपाप्रणित एनडीएचं सरकार काम करतंय.देशातल्या जनतेचा भाजपावर विश्वास कायम आहे. त्यामुळे भाजपा यंदा लोकसभा विजयाची हॅटट्रिक करेल. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मोदींच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) विरुद्ध कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस, आम आदमी पार्टी, द्रविड मुन्नेत्र कळघम, शिवसेना (ठाकरे गट) आणि जनता दल युनायटेड या पक्षांची इंडिया आघाडी यांच्यात सामना होणार आहे.

# रेड्डींची बहीण कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

तेलंगणात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसनं भारत राष्ट्र समितीचा पराभव केला होता. आता कॉंग्रेसनं आपला मोर्चा आंध्र प्रदेशकडे वळवला आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांची बहीण वायएस शर्मिला ४ जानेवारीला कॉंग्रेसमध्ये प्रवेश करू शकतात. त्यामुळे आंध्र प्रदेशात कॉंग्रेसला फायदा होण्याची शक्यता आहे. वायएस शर्मिला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांची बहीण आहे. वायएस शर्मिला यांचे वडील वायएसआर रेड्डी संयुक्त आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले आहेत. ते कॉंग्रेसकडून आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री झाले होते. २०१२ सालीजगन मोहन रेड्डी यांनी कॉंग्रेसला राम-राम ठोकत युवाजना श्रमिका रायथू कॉंग्रेस पक्षाचीस्थापना केली होती. मात्र, भ्रष्टाचार प्रकरणात जगन मोहन रेड्डींना तुरूंगात जावं लागलं होतं. यानंतर जगन मोहन रेड्डी यांच्या आई वायएस विजयम्मा आणि बहीण वायएस शर्मिला यांनी वायएसआर कॉंग्रेस पक्षाची धुरा संभाळली. तुरूंगातून बाहेर आल्यावर जगन मोहन रेड्डी यांनी विधानसभा निवडणुकीत विजय मिळवत मुख्यमंत्री झाले. यानंतर वायएस शर्मिला आणि जगन मोहन रेड्डी यांच्यात मतभेद झाले.

शर्मिला यांनी युवाजना श्रमिका रायथू तेलंगणा पक्षाची ( वायएसआरटीपी ) स्थापना केली. तेलंगणात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्याआधी वायएस शर्मिला यांनी कॉंग्रेसला पाठिंबा दर्शवला होता. मतविभाजन होऊन भारत राष्ट्र समितीला फायदा होऊ नये म्हणून शर्मिला यांना हा निर्णय घेतला होता.

# पत्नीला पाहून खिलाडी अक्षय खळखळून हसला

अभिनेता अक्षय कुमारची (AKSHAY KUMAR) पत्नी ट्विंकल खन्ना (TWINKLE KHANNA) ही सोशल मीडियावर खूप ॲक्टीव असते. ट्विंकल आणि अक्षय हे त्यांच्या कुटुंबासह सुट्टीसाठी मालदीवला गेली आहे. जिथे ट्विंकलनं तिच्या संपूर्ण कुटुंबासोबत वाढदिवस देखील साजरा केला. ट्विंकलने आता एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये मालदीवमध्ये तिच्यासोबत घडलेली एक मजेशीर घटना दिसत आहे. ट्विंकलनं या व्हिडीओला खास कॅप्शन देखील दिलं आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये संपूर्ण ट्रीपची खास झलक दाखवली आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला ट्विंकल सायकल चालवताना दिसते सायकलिंग करताना तिचा तोल जातो आणि ती एका खांबाला धडकते, असं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. अशताच पत्नीला खांबाला धडकताना पाहून अक्षय कुमार खळखळून हसतो. ट्विंकलनं इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या मालदीव ट्रीपच्या व्हिडीओला कॅप्शन दिलं, 'माझी सायकल खांबाला धडकण्या व्यतिरिक्त, ही ट्रीप मला खरोखरच स्वर्गात गेल्यासारखी वाटली.तुमच्याकडे नवीन वर्षासाठी कोणतेही मोठे संकल्प असतील तर ते खाली कमेंटमध्ये शेअर करुन इतरांना प्रेरणा द्या' ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये तुम्हाला ट्विंकलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनची झलकही पाहायला मिळेल. ज्यामध्ये ती केक कट करताना दिसत आहे. याशिवाय ट्विंकलनं तिथे तिच्या पुस्तकाची सक्सेस पार्टीही ठेवली

# रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. सैराट चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या रिंकूनं प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं आहे. रिंकू ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. रिंकूनं इन्स्टाग्रामवर नेटकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहे. रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले आहे. 'तुझं टोपणनाव काय आहे?' असा प्रश्न एका नेटकऱ्यानं रिंकूला इन्स्टाग्रामवर विचारला. या प्रश्नाला रिंकूनं उत्तर दिलं, 'रिंकू' त्यानंतर आणखी एका नेटकऱ्यानं रिंकूला प्रश्न विचारला, 'रिंकू हे तुझं टोपणनाव आहे तर मग तुझं खरं नाव काय आहे?' या प्रश्नाचं रिंकूनं उत्तर दिलं, 'प्रेरणा' रिंकूचं खरं नाव प्रेरणा आहे, हे अनेकांना माहित नसेल. 'झिम्मा-2 नंतर कोणता नवा प्रोजेक्ट येणार?' असा प्रश्न देखील एका युझरनं रिंकूला विचारला. या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, 'लवकरच कळवते.' 2023 मधील तुझी सर्वात आवडती आठवण कोणती? असा प्रश्न एका नेटकऱ्यानं विचारला. या प्रश्नाचं रिंकूनं केदारनाथच्या मंदिराजवळील फोटो शेअर करुन उत्तर दिलं. रिंकूचा झिम्मा-2 हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात रिंकूसोबतच सुहास जोशी, निर्मिती सावंत,क्षिती जोग,सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव आणि शिवानी सुर्वे या कलाकारांनी देखील प्रमुख भूमिका साकारली आहे.

# प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटमधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला.

व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॅबी देओलस आणि डॉनस... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस. तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# 'खुर्ची' चा जबरदस्त ट्रेलर रिलीज

अभिनेता अक्षय वाघमारे (AKSHAY WAGHMARE) आणि राकेश बापट (RAQESH BAPAT) यांच्या 'खुर्ची' (KHURCHI) या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील डायलॉग्सनं आणि कलाकारांच्या अभिनयानं प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या ट्रेलरला नेटकऱ्यांची पसंती मिळत आहे. खुर्ची या चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात "मी राजवीर राजाराम देसाई,एक दिवस खुर्ची आपलीच असणार" या डायलॉगनं होते. त्यानंतर ट्रेलरमध्ये अक्षय वाघमारेची एन्ट्री होते. ट्रेलरमध्ये अक्षयचा "पाहिजे, पाहिजे, भिती पाहिजे." हा डायलॉग ऐकू येतो. अक्षय हा खुर्ची या चित्रपटात सम्राट ही भूमिका साकारत आहे. 'खुर्ची' या बहुप्रतीक्षित चित्रपटात राकेश बापट, अक्षय वाघमारे, आर्यन हगवणे, प्रीतम कागणे, श्रेया पासलकर, महेश घाग, कल्याणी नंदकिशोर, सुरेश विश्वकर्मा हे कलाकार महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. खुर्ची या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच इव्हेंट नुकताच पार पडला. या इव्हेंटला चित्रपटातील कलाकारांनी हजेरी लावली. तसेच अक्षय वाघमारेच्या पत्नीनं देखील या इव्हेंटला हजेरी लावली. 'खुर्ची' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा शिव धर्मराज माने आणि संतोष कुसुम हगवणे यांनी सांभाळली आहे. हा चित्रपट 12 जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी खुर्ची या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला होता. या टीझरनं देखील अनेकांचे लक्ष वेधले होते. राजकारणाचे विविध रंग या चित्रपटात रेखाटण्यात आले आहेत. चित्रपटाची गाणी प्रशांत मडपुवर, सौरभ आणि सोमनाथ शिंदे यांनी लिहिली असून, त्यांना सन्मित वाघमारे, अभिषेक काटे यांनी संगीत दिले आहे. आदर्श शिंदे, अवधूत गुप्ते, अभय जोधपुरकर, रसिका वाखरकर, अमिता घुगरी आणि आर्यन यांनी या चित्रपटातील गाणी गायली आहेत. आता 'खुर्ची' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# 'ओरी'ची पलकनं का मागितली माफी?




गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणी (ORHAN AWATRAMANI) हा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारी (PALAK TIWARI) आणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे. पलकनं ओरीला मेसेज केला, "ओरी, मी पलक बोलत आहे. मी तुझी माफी मागावी, असं तुला वाटत आहे का?" यावर ओरीनं इमोजी शेअर करुन रिप्लाय दिला. ओरीच्या मेसेजनंतर पलकनं रिप्लाय दिला, "मी साराच्या सन्मानार्थ बोलत आहे." यावर ओरीनं रिप्लाय दिला, 'एकतर तू स्वाभिमानाने माफी मागत आहेस कारण तुला कसं बोलावं कळत नाही' आता पलकनं ओरीची माफी का मागितली? हा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये साराच्या नावाचा देखील उल्लेख आहे. ही सारा अली खान आहे, असा अंदाज नेटकरी लावत आहे. सारा अली खानचा भाऊ इब्राहिम अली खानला पलक डेट करत आहे, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर होत आहे. पलक आणि इब्राहिम या दोघांना अनेक वेळा एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं आहे. द वर्जीन ट्री या चित्रपटमधून पलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मौनी रॉय आणि संजय दत्त हे देखील महत्वाची भूमिका साकारणार आहेत. तिचा किसी का भाई किसी की जान हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला. तसेच इब्राहिम हा सरजमीन या चित्रपटामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे, असंही म्हटलं जात आहे.गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणी हा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारी (PALAK TIWARI) आणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे.

# यंदा आरसीबी किताब जिंकणार?

## धोनीचे आयपीएलमधील शेवटचे वर्ष; ऋषभ पंतचे पुनरागमन?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**क्रिकेटसाठी 2023 प्रमाणेच 2024 हे वर्ष महत्वाचे असणार आहे. अंडर 19 वर्ल्डकप, टी 20 वर्ल्डकप आणि महिला टी20 वर्ल्डकप 2024 या वर्षात खेळवण्यात येणार आहे. याशिवाय दरवर्षीपेक्षा यावर्षीचा आयपीएलचा हंगाम विशेष असेल. टी 20 वर्ल्डकपपूर्वी आयपीएलच्या (IPL) 17 व्या हंगामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे क्रिकेट (CRICKET) रसिकांसाठी यंदाचे वर्ष बऱ्याच अंगांनी मनोरंजन करणारे ठरेल.**



नव्या वर्षात अनेकांच्या काहीतरी वेगळे करुन दाखवण्याच्या इच्छा असतात. त्यामुळे 2024 च्या आयपीएल (IPL) हंगामात अनेक संघांना सनसनाटी विजय मिळवण्याची आशा असेल. दरम्यान यंदाच्या आयपीएलमध्ये (IPL) काही खेळाडूंवर सर्वांची विशेष नजर असणार आहे. जाणून घेऊयात 2024 मध्ये कोणाच्या कोणत्या अपेक्षा आहेत? आयपीएल 2024चा हंगाम महेंद्रसिंह धोनीसाठी (MS DHONI) शेवटचा आयपीएल हंगाम ठरण्याची शक्यता आहे. 42 वर्षीय एम.एस.धोनी चेन्नई सुपर किंग्जला 5 जेतेपद पटकावून दिलय. धोनी 2019 पासून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेला नाही. त्याने 2020 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलीये. दरम्यान, कॅप्टन कूल (CAPTAIN COOL) अशी ओळख असणाऱ्या धोनीने आयपीएलमध्येही दमदार कामगिरी केलीये. गेल्यावर्षी अनेकांना वाटत होते की, हाच धोनीचा (MS DHONI) शेवटचा आयपीएल हंगाम आहे. मात्र, धोनीही यंदाच्या वर्षीही मैदानात उतरणार आहे. दिल्ली कॅपिटल्सचा (DELHI CAPITALS) यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत (RISHABH PANT) अपघातातून सावरत पुन्हा एकदा मैदानात उतरण्यासाठी सज्ज आहे. 2022 मध्ये अपघात झाल्यानंतर त्याला पूर्णपणे ठीक व्हायला बराच वेळ लागलाय. त्यानंतर मैदानात उतरण्यासाठी त्याने मेहनत घेतलीये. ऋषभच्या अनुपस्थितीत डेव्हिड वॉर्नरने दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व केले होते. पंतने 2016 मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केलं होतं. त्याने 98 सामने खेळत 2838 धावा केल्यात. नवे वर्ष नव्या आशा घेऊन येते. रॉयल चॅलेंजर्स बेंगलोरचा (RCB) संघ 2008 पासून पहिल्या ट्रॉफीच्या प्रतिक्षेत आहे. यंदाच्या वर्षात तरी आरसीबीला चॅम्पियन बनता येईल का? हा मोठा प्रश्न आहे. विराट कोहली (VIRAT KOHLI), एबी डिवीलियर्स आणि क्रिस गेलने 2016 मध्ये आरसीबीला अंतिम सामन्यात पोहोचवले होते. मात्र, अंतिम सामन्यात आरसीबीचा हैदराबादने पराभव केला होता. दरम्यान, 2016 नंतर आरसीबीला अंतिम सामन्यात धडक मारता आलेली नाही. रोहित शर्माच्या (ROHIT SHARMA) जागी हार्दिक पंड्याकडे (HARDIK PANDYA) मुंबई इंडियन्सच्या (MUMBAI INDIANS) कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आलीये. रोहितच्या जागी हार्दिककडे नेतृत्व दिल्याने मुंबईचे चाहते चांगलेच नाराज झाले होते. रोहितने आजवर आयपीएलमध्ये मोठं यश मिळवलंय. रोहितप्रमाणे आयपीएलमध्ये हार्दिकला यश येणार का? हा प्रश्न चाहत्यांना पडलाय. गौतम गंभीर (GAUTAM GAMBHIR) आयपीएल 2023 च्या हंगामात लखनौ सुपर जायंट्सच्या संघात प्रशिक्षक म्हणून काम करत होता. आता कोलकाता नाईट रायडर्समध्ये तो मेंटॉर म्हणून कार्यरत असणार आहे.

गौतम गंभीरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्सचा संघ 2 वेळेस चॅम्पियन बनला होता. त्यामुळे यंदाच्या गंभीरच्या प्रशिक्षणात कोलकाताचा संघ कशी कामगिरी करतो? याकडे चाहत्यांचे लक्ष आहे.नव्या वर्षात अनेकांच्या काहीतरी वेगळे करुन दाखवण्याच्या इच्छा असतात. त्यामुळे 2024 च्या आयपीएल (IPL) हंगामात अनेक संघांना सनसनाटी विजय मिळवण्याची आशा असेल. दरम्यान यंदाच्या आयपीएलमध्ये (IPL) काही खेळाडूंवर सर्वांची विशेष नजर असणार आहे. जाणून घेऊयात 2024 मध्ये कोणाच्या कोणत्या अपेक्षा आहेत? आयपीएल 2024चा हंगाम महेंद्रसिंह धोनीसाठी (MS DHONI) शेवटचा आयपीएल हंगाम ठरण्याची शक्यता आहे.

### गौतम गंभीरची घर वापसी

42 वर्षीय एम.एस.धोनी चेन्नई सुपर किंग्जला 5 जेतेपद पटकावून दिलय. धोनी 2019 पासून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेला नाही. त्याने 2020 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलीये. दरम्यान, कॅप्टन कूल (CAPTAIN COOL) अशी ओळख असणाऱ्या धोनीने आयपीएलमध्येही दमदार कामगिरी केलीये. गेल्यावर्षी अनेकांना वाटत होते की, हाच धोनीचा (MS DHONI) शेवटचा आयपीएल हंगाम आहे. मात्र, धोनीही यंदाच्या वर्षीही मैदानात उतरणार आहे. दिल्ली कॅपिटल्सचा (DELHI CAPITALS) यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत (RISHABH PANT) अपघातातून सावरत पुन्हा एकदा मैदानात उतरण्यासाठी सज्ज आहे. 2022 मध्ये अपघात झाल्यानंतर त्याला पूर्णपणे ठीक व्हायला बराच वेळ लागलाय. क्रिकेटसाठी 2023 प्रमाणेच 2024 हे वर्ष महत्वाचे असणार आहे. अंडर 19 वर्ल्डकप, टी 20 वर्ल्डकप आणि महिला टी20 वर्ल्डकप 2024 या वर्षात खेळवण्यात येणार आहे. याशिवाय दरवर्षीपेक्षा यावर्षीचा आयपीएलचा हंगाम विशेष असेल.

# रोहित शर्मा अफगाणिस्तानविरुद्ध पुनरागमन करणार?

## पुढच्या आठवड्यात BCCI करणार संघाची घोषणा

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय कर्णधार रोहित शर्मा वर्षभराच्या विश्रांतीनंतर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. बीसीसीआयच्या एका सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, तो अफगाणिस्तानविरुद्ध सुरू होणाऱ्या टी-२० मालिकेत टीम इंडियामध्ये परतणार आहे.**



जर रोहित शर्मा या मालिकेत पुनरागमन करत असेल तर याचा स्पष्ट अर्थ असा आहे की बीसीसीआय त्याला टी-२० विश्वचषकात टीम इंडियाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देत आहे. मात्र, याबाबतचा अंतिम निर्णय अजूनही झालेला नाही. बीसीसीआयच्या एका सूत्राने दिलेल्या वृत्तानुसार, अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेत रोहित शर्मा भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, "हार्दिक पंड्या दुखापतग्रस्त आहे त्यामुळे त्याच्या जागी रोहित शर्माच टीम इंडियाचा कर्णधार होऊ शकतो असे त्याने म्हटले आहे. आम्ही रोहित शर्माबरोबर दीर्घकाळ चर्चा केली असून तो टी-२० विश्वचषकात कर्णधारपद स्वीकारण्यास तयार आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर लगेचच भारतीय संघाला अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी टीम इंडियाची ही शेवटची टी-२० मालिका असणार आहे. अशा स्थितीत, विश्वचषकासाठी टीम कॉम्बिनेशनसह इतर गोष्टी आजमावण्याची भारतासाठी ही कदाचित शेवटची संधी असेल. त्यामुळेच ही मालिका खूप महत्त्वाची मानली जात आहे. आतापर्यंत असे मानले जात होते की रोहित शर्मा अफगाणिस्तान मालिकेत क्वचितच सहभागी होईल. २०२४च्या टी-२० वर्ल्ड कपमध्येही रोहित नसल्याचा दावा केला जात होता. गेल्या टी-२० विश्वचषकापासून रोहित कोणत्याही टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेत सहभागी झाला नाही, त्यामुळे अशी अटकळ बांधली जात होती. तसेच, हार्दिक पंड्याचा कर्णधारपदासाठीचा दावा हेही यामागे मोठे कारण होते. सध्या टीम इंडिया एकापेक्षा एक स्टार खेळाडूंनी भरलेली आहे. अशा परिस्थितीत तरुण खेळाडूंना संधी देण्यासाठी वरिष्ठ खेळाडूंना एक किंवा दोन क्रिकेट फॉरमॅटपर्यंत मर्यादित ठेवण्याचा दबाव बीसीसीआयवर आहे.

### आढावा बैठकीतच झाला निर्णय!

विश्वचषकानंतर झालेल्या बैठकीत रोहित शर्माने बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांशी टी-२० विश्वचषकाबाबत स्पष्ट चर्चा केली. २०२४च्या टी-२० वर्ल्ड कपसाठी बीसीसीआयच्या योजनांमध्ये त्याचा समावेश आहे का? त्यामुळे प्रशिक्षक राहुल द्रविड आणि निवड समितीसह बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी याला सहमती दर्शवली.